# महाराष्ट्र शासन
# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०१७ सत्रासाठी प्रवेश सुचना

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०१७ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (**Centralized Online Admission Process**) पध्दतीने करण्यांत येत आहेत.

प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी प्रवेश प्रक्रियेला दिलेल्या मुदतवाढीमुळे नियमित प्रवेश फेऱ्यांनंतर शासकीय औ.प्र.संस्थेत रिक्त राहिलेल्या जागांसाठी दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजी विशेष समुपदेशन फेरी घेण्याचे व खाजगी औ.प्र.संस्थेत रिक्त जागांसाठी संस्थास्तरावर प्रवेश निश्चिती साठी दि. १३ सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे. औ.प्र. संस्थानिहाय रिक्त जागांचा तपशील प्रवेश संकेत स्थळावर “Vacant Seats Details” मध्ये उपलब्ध आहे.

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे :** | | |
| १.१ | ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज पुर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Print Out) घेणे. | १० सप्टेंबर, २०१७ स.९.०० वाजेपासून | १२ सप्टेंबर, २०१७ सांय.५.०० वाजेपर्यंत |
| १.२ | अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थेत) मुळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज शुल्क भरुन अर्ज निश्चित (Confirmation) करणे | | |
| **२** | **शासकीस औ.प्र.संस्थेत रिक्त राहिलेल्या जागांसाठी विशेष समुपदेशन फेरी :** | | |
| २.१ | शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित शासकीय औ.प्र. संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | १३ सप्टेंबर, २०१७, सकाळी ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत | |
| २.२ | हजेरी नोंदवीलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करण्यात येईल. या पूर्वीच्या मुदतीत नोंदणी केलेल्या उमेदवारांनाची संबंधीत संस्थेत प्रथम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व दि. १० ते १२ सप्टेंबर, २०१७ दरम्यान नोंदणी केलेल्या उमेदवारांची त्यानंतर गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. | १३ सप्टेंबर, २०१७, सकाळी ११.०० वाजेपर्यंत ते समुपदेशन फेरी संपेपर्यंत | |
| २.३ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची पात्रता व अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित करावे. | | |
| २.४ | या पूर्वीच्या प्रवेश फेऱ्यांत अनिवार्य प्राधान्य क्रमांका वर जागा मिळुनही प्रवेश न घेतलेले, प्रवेश रद्द कलेले व पूर्वीच्या समुपदेशन फेरीत जागा मिळुनही प्रवेश न घेतलेले उमेदवार या विशेष समुपदेशन फेरी करिता अपात्र आहेत. | | |
| **३** | **खाजगी औ.प्र.संस्थेत रिक्त जागांसाठी संस्थास्तरावर प्रवेशासाठी मुदत वाढ :** | | |
| ३.१ | खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व चौथ्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा संबंधीत खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध आहेत. | २५ जूलै, २०१७ स.९.०० वाजेपासून | १३ सप्टेंबर, २०१७ सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ३.२ | नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी | | |
| ३.३ | राज्यातील सर्व मान्यता प्राप्त खाजगी औ.प्र.संस्थांची यादी http://admission.dvet.gov.in, www.dvet.gov.in तसेच www.ncvtmis.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. तरी प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळांना एकवेळ अवश्य भेट दयावी. | | |

**टिप: प्रवेशीत सर्व उमेदवारांनी दि. १३ सप्टेंबर, २०१७ पर्यंत आपला आधार क्रमांक प्रवेशीत औ.प्र.संस्थेत नोंदवावा. आधार क्रमांक सादर न करणाऱ्या उमेदवारांची माहिती केंद्रीय पोर्टल i.e. NCVT-MIS वर नोंदवीणे शक्य होणार नसल्याने असे उमेदवार परिक्षा देऊ शकणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

Sd/-
( अनिल म. जाधव )
प्र. संचालक

स्थळ: मुंबई
दि.: १० सप्टेंबर, २०१७

**http://admission.dvet.gov.in**